

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात अभिवादन करताना मान्यवर.

# यशवंतराव चव्हाण यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** माजी उपपंतप्रधान आणि महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतींना पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन केले. विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमध्ये चव्हाण यांच्या प्रतिमेला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. महात्मा गांधी अभ्यास केंद्राच्या प्रमुख डॉ. भारती पाटील, चव्हाण स्कूलचे सुधीर देसाई, उमेश गडेकर, गजानन साळुंखे, डॉ. नितीन माळी, अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले आदी उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : भारताचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. हा कार्यक्रम विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमध्ये येथे पार पडला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महात्मा गांधी अभ्यास केंद्राच्या प्रमुख डॉ. भारती पाटील, चव्हाण स्कूलचे सुधीर देसाई, उमेश गडेकर, गजानन साळुंखे, डॉ. नितीन माळी, अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले आदी उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**कोल्हापूर :** माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. डॉ. भारती पाटील, सुधीर देसाई, उमेश गडेकर, गजानन साळुंखे, डॉ. नितीन माळी, अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले उपस्थित होते.

# महाविद्यालये सुरू करताना घाई नको

## कोरोनाच्या स्थितीचा विचार व्हावा : दक्षता घ्यावी; उच्च शिक्षणक्षेत्रातील घटकांचे मत

■ संतोष मिठारी
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोनामुळे आठ महिन्यांपासून बंद असणाऱ्या शाळा गेल्या तीन दिवसांपासून टप्प्याटप्प्याने सुरू होत आहेत. दिवसागणिक त्यांची संख्या वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर कोरोना संसर्गाच्या स्थितीचा विचार आणि आवश्यक ती खबरदारी घेऊन कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालये सुरू करावीत. दक्षतेची खात्री झाल्यानंतरच शिवाजी विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी वर्ग भरविण्याची कार्यवाही करावी, असे मत जिल्ह्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील घटकांनी बुधवारी व्यक्त केले.

विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील विविध विद्याशाखांच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पहिल्या सत्राचा प्रारंभ २२ जूनला झाला. हे सत्र १० नोव्हेंबर रोजी संपले. द्वितीय सत्राचा प्रारंभ २ डिसेंबरला होणार असून, त्यातील पदवीचे सत्र हे १० मे रोजी, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे सत्र २५ मे रोजी संपणार आहे. पहिल्या सत्राच्या प्रारंभापासून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या द्वितीय, तृतीय वर्षांचे ऑनलाईन वर्ग सुरू झाले. त्याला विद्यार्थ्यांचा फारसा प्रतिसाद नाही. त्यामुळे इयत्ता नववी ते बारावीचे वर्ग भरण्याच्या सुरू झालेल्या कार्यवाहीच्या धर्तीवर पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वर्ग सुरू करावेत. मात्र, त्यापूर्वी खबरदारी घ्यावी, असे मत प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केले.

### प्राचार्य संघटनेला काय वाटते?

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा विचार करून विद्यापीठ आणि महाविद्यालय व्यवस्थापनांनी वर्ग सुरू करण्याचा निर्णय घ्यावा. याबाबत कोणत्याही स्वरूपातील घाई करण्यात येऊ नये, अशी प्रतिक्रिया शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी सांगितले.



### प्राध्यापक संघटनेला काय वाटते?

विद्यार्थ्यांचा विचार करता महाविद्यालयांतील वर्ग सुरू व्हावेत, अशी आमची भूमिका आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेबाबतच्या खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात. या उपाययोजनांची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी डॉ. डी. एन. पाटील यांनी केली.

### तालुकानिहाय महाविद्यालये

| | |
|---|---|
| आजरा | २ |
| भुदरगड | ३ |
| चंदगड | ५ |
| गडहिंग्लज | १२ |
| गगनबावडा | २ |
| हातकणंगले | २५ |
| कागल | ८ |
| करवीर | ३७ |
| पन्हाळा | १२ |
| राधानगरी | ३ |
| शाहूवाडी | ४ |
| शिरोळ | ८ |

विद्यापीठातील अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयांचे द्वितीय सत्र २ डिसेंबरपासून सुरू होईल. सध्या द्वितीय, तृतीय वर्षांचे ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. वर्ग सुरू करण्याचा विषय अधिकार मंडळांसमोर ठेवला आहे. विद्यार्थी, शिक्षकांच्या सुरक्षिततेचा विचार केला जाईल. शासनाचे निर्देश आणि अधिकार मंडळांच्या सूचनेनुसार वर्ग सुरू करण्याबाबतची कार्यवाही केली जाईल.

**-डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

प्रात्यक्षिकांसह अन्य शैक्षणिक बाबींचा विचार करता वर्ग सुरू झाले पाहिजेत. मात्र, त्याबाबत कोरोनाच्या स्थितीचा विचार करून शासनाने आदेश द्यावेत.

**-ऋतुराज माने, निमंत्रक, मराठा आरक्षण विद्यार्थी कृती समिती**

नववी ते बारावीपाठोपाठ आता दक्षता घेऊन पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यापीठ, महाविद्यालयांमधील वर्ग सुरू करण्यास हरकत नाही. त्या दृष्टीने निर्णय घ्यावा.

**- वसंतराव मगदूम, संस्थापक-अध्यक्ष, विद्यापीठ कर्मचारी संघ**

### जिल्ह्यातील आकडेवारी दृष्टिक्षेपात

| | |
|---|---|
| महाविद्यालये | १२१ |
| मुले | ५८,८९९ |
| मुली | ५०,५२५ |
| एकूण विद्यार्थी | १,०९,४२४ |

- पहिल्या सत्राच्या प्रारंभापासून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या द्वितीय, तृतीय वर्षांचे ऑनलाईन वर्ग सुरू झाले. त्याला प्रतिसाद कमी आहे.
- अंतिम वर्षांच्या एकूण १७२ परीक्षा ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने घेतल्या. त्यांपैकी १७१ परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत.
- बी. ए. अभ्यासक्रमाचा निकाल बाकी आहे. प्रवेश परीक्षांचे निकाल चार दिवसांमध्ये जाहीर होतील, असे गजानन पळसे यांनी सांगितले.

# विकास योजना त्वरित राबवणार

## शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या विशेष बैठकीत निर्णय

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेची बैठक पार पडली. या बैठकीत विद्यापीठातील विकासाच्या योजना काय असाव्यात यासंदर्भात चर्चा करण्यात आली. क्रीडा, कृषी, संशोधन क्षेत्रात इच्छुक विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा पुरवून विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या नोकरीचा टक्का वाढवणार असल्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

**बैठक...!**

- विकास योजनांवर सविस्तर चर्चा
- विद्यार्थ्यांच्या नोकरीचा टक्का वाढवण्याचा निर्धार
- सदस्यांनी मांडल्या विविध सूचना

बैठकीत ॲड. धैर्यशील पाटील यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल करून प्रत्येक खेळासाठी एक मैदान तयार करावे. बॅडमिंटन, बास्केटबॉल, मैदानी खेळात हॉकी, कब्बडी, शुटींग खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्यासंदर्भात प्रयत्न करावे. मल्टी फॅसेलिटी इन्टरनॅशनल इनडोअर स्टेडीयमचे काम सुरू करावे. तसेच बुद्धीबळ केंद्र सुरू व्हावे. ॲग्रीकल्चर, सेरीकल्चर हायड्रोफोनिकमध्ये कमी जागेत जास्तीत जास्त उत्पान घेण्यासंदर्भात कृषीचे विविध अभ्यासक्रम सुरू करावे. कृषीसंदर्भात सर्टीफिकेट कोर्स सुरू करावे. डॉ. आर. के. कामत यांनी जिल्ह्यातील मोठ्या इंडस्ट्रीबरोबर सामंजस्य करार करून विद्यापीठात वर्कशॉप उभा करावे. तसेच संशोधक विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान द्यावे. सायबर सिक्युरीटी आणि डेटा सायन्समध्ये राष्ट्रीय केंद्र सुरू करावे असे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी नॅक मूल्यांकनासाठी प्रक्रियेत असलेल्या महाविद्यालयांना प्रशिक्षण द्यावे. जैवविविधता संवर्धनासाठी प्रत्येक जिल्ह्यात जैवविविधता संवर्धन पार्क सुरू करावे अशा सूचना मांडलया. डॉ. भारती पाटील यांनी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट इमारतीचे बांधकाम करावे. फिनिशिंग स्कूल सुरू करावे. महाराणी ताराराणी ह्युमन एंपॉरमेंट स्कूल सुरू करावे. लोककला संवर्धनासाठी विद्यापीठाच्या योजना सुरू करून विद्यापीठात लोककलेचे संवर्धन करावे असे सुचविले. डॉ. प्रकाश कुंभार यांनी विद्यार्थ्यांकडे काय कौशल्य आहेत त्यानुसार अभ्यासक्रम सुरू करावे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. निखिल गायकवाड यांनी प्रत्येक फॅकल्टीला प्रोजेक्ट देऊन प्लेसमेंट वाढवण्यासंदर्भात प्रयत्न करावेत अशा सूचना केल्या. डॉ. कोरबू क्लिनिकल सायकॉलॉजीचे अभ्यासक्रम सुरू करावे असे मत मांडले. डॉ. शेवाळे यांनी सामाजिक कार्य वाढवण्याचा प्रस्ताव मांडला.

डॉ. एस. एस. ठक्कार यांनी संशोधन पार्क सुरू करून संशोधक विद्यार्थ्यांना इंडस्ट्रीमधील लोकांनी मार्गदर्शन करावे असे सूचित केले.



# बॅकलॉगच्या परीक्षा डिसेंबरमध्ये

प्रतिनिधी
कोल्हापूर

- परीक्षा विभागाच्यावतीने नियोजनाला प्रारंभ
- विद्यापीठ परीक्षांचे ९९ टक्के निकाल जाहीर

शिवाजी विद्यापीठ पदवी अंतिम सत्राच्या परीक्षा पार पडल्या. या परीक्षांचे निकाल टप्प्याटप्याने लावण्याचे काम सुरू आहे. आजपर्यंत १७२ परीक्षांपैकी १७१ म्हणजेच ९९ टक्के निकाल जाहीर झाले आहेत. तसेच विद्यापीठातील प्रवेश पूर्व परीक्षेतील एमबीए विषयाचा निकाल जाहीर झाला आहे. तर बॅकलॉगच्या परीक्षा डिसेंबरमध्ये घेण्याचे नियोजन परीक्षा विभागाच्यावतीने सुरू आहे.

शिवाजी विद्यापीठातील पदवी अंतिम सत्राच्या परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने सुरळीत पार पडल्या. या परीक्षांचे निकालही वेळेत लावून विद्यार्थांना परीक्षा विभागाने न्याय दिला आहे. बी. ए. परीक्षेचा निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून अंतिम टप्प्यात आहे. डिसेंबरमध्ये बॅकलॉगच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. त्यासंदर्भात अधिकार मंडळाबरोबर चर्चा सुरू असून परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाणार आहे.

**गैरहजर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे नियोजन**

पदवी अंतिम सत्राच्या परीक्षेला गैरहजर विद्यार्थ्यांची परीक्षा लवकरच घेण्यासंदर्भात विचार विनीमय सुरू आहे. परीक्षांची निकाल प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांना परिपत्रक पाठवून गैरहजर विद्यार्थ्यांची यादी मागवली जाणार आहे. त्यामुळे डिसेंबरमध्ये पदवी अंतिम सत्राच्या परीक्षेला गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे नियोजन आहे.

# शैक्षणिक नियोजनाचे सादरीकरण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्यांकडून बुधवारी पुढील पाच वर्षांच्या शैक्षणिक नियोजनाचे सादरीकरण करण्यात आले. त्यानुसार महत्त्वाच्या गोष्टींच्या अंमलबजावणीवर भर दिला जाणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत व्यवस्थापन परिषद सदस्यांची विद्यापीठात बैठक झाली. सदस्यांनी पुढील पाच वर्षांतील शैक्षणिकसह अन्य बाबींच्या नियोजनाबाबत सादरीकरण केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी.पाटील आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ विकास आराखडा निर्मितीला प्रारंभ

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची आज बैठक झाली. यात परिषदेच्या सदस्यांनी विद्यापीठ विकास आराखड्याबाब त चर्चा केली.

प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी विद्यापीठाचा सर्वांगीण विकास साधण्याबाबतची मांडणी केली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन चांगल्या पद्धतीने करून घेण्याची जबाबदारी डॉ. कणसे यांनी घ्यावी, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले. अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, भारती पाटील, प्रकाश कुंभार, आर. जी. कोरबू, धैर्यशील पाटील, निखिल गायकवाड यांनी चर्चेत सहभाग घेतला. उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी विद्यापीठाच्या जलव्यवस्थापनाची सद्य:स्थिती सादर केली.